१२

# "महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास"

संशोधक,
श्री. विलास खंडाईत
किसन वीर महाविद्यालय, वाई.ता.वाई जि.सातारा

मार्गदर्शक,
डॉ. वंदना नलवडे
प्राचार्य, आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा.

## सारांश

जादूटोणाविरोधी कायदा २६ ऑगस्ट २०१३ रोजी पारित केला आहे. याचे कारण म्हणजे समाजात आजही अनिष्ट अघोरी प्रथा व अंधश्रध्दा जास्त प्रमाणात आढळतात. त्याचा अप्रत्यक्ष परिणाम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जाणवतो. तसेच त्यांच्यामध्ये जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती फारशी झालेली नाही. म्हणूनच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती निर्माण व्हावी, तसेच वैज्ञानिक दृष्टिकोण, मानवतावाद, सुधारणावाद, शोधक बुध्दीचा विकास व्हावा यासाठी संशोधकाने सदर विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम तयार केला आहे व त्याची परिणामकारकताही तपासली आहे.

संशोधकाने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कार्यक्षेत्रातील सातारा जिल्ह्यातील वाई, खंडाळा आणि महाबळेश्वर या तालुक्यातील प्रत्येकी एक कला, वाणिज्य, विज्ञान शाखा असलेल्या महाविद्यालयाची निवड केली. एकूण २५०० विद्यार्थ्या पैकी केवळ २८८ विद्यार्थ्यांची निवड संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील लॉटरी पध्दतीने केली. निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी संशोधक निर्मित पूर्वचाचणी घेतली. सदर विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली संशोधकाने तयार केला. निवड केलेल्या विद्यार्थ्यांवर प्रभावीपणे राबविला. त्यानंतर उत्तरचाचणी घेतली. यासाठी प्रायोगिक एकलगट पूर्वोत्तर चाचणी अभिकल्पाचा वापर केला. पूर्वउत्तर चाचणीच्या गुणांवर केंद्रीय प्रवृत्तीच्या परिमाणांचा वापर केला. मध्यमानातील फरकाची सार्थ कता तपासण्याकरिता 'टी' परीक्षिकेचा वापर केला.

सदर संशोधनावरून असे लक्षात आले की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अंधश्रध्दा आहेत. तसेच जादूटोणाविरोधी कायद्याबाबत फारशी जाणीवजागृती झालेली नाही. सदर विषयावर संशोधक निर्मित प्रशिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबविला असता विद्यार्थ्यांच्या जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृतीच्या पातळीवर लक्षणीय वाढ होईल असे संशोधकास वाटते.

बीज संज्ञा : जादूटोणाविरोधी कायदा जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रम.

## १. प्रस्तावना :

आजच्या विज्ञान युगातही वाढती अंधश्रध्दा, भोंदुगिरी, चमत्काराद्वारे आर्थिक फसवणूक, बुवाबाजीतून स्त्रियांचे शोषण, गुप्तधनासाठी नरबळी, पैशांचा पाऊस पाडण्याचा दावा, अवतार असल्याचा दावा, अतिंद्रियशक्ती संचारल्याचा दावा, आत्म्याशी काल्पनिक विवाह किंवा आत्मा बोलावून प्लँचेट करणे, . . . यांसारख्या कित्येक घटना समाजामध्ये घडताना दिसतात.

याला शहरी सुशिक्षित समाजही अपवाद नाही. करणी, जारणमारण, भानामती, जादूटोणा, भुताने झपाटणे, मूट मारणे, चेटूक त्याचबरोबर नशीब, भविष्य, फलज्योतिष, कुंडली यांसारख्या गोष्टींवर स्वकर्तृत्वापेक्षा प्रचंड श्रध्दा असल्याचे दिसते. युवकांमध्ये न्युनगंड, ताणतणाव, काल्पनिक भीतीचे वातावरण असल्याचे जाणवते.

हे सर्व केव्हातरी संपायला हवे. आजचे युवक उद्याच्या भारताचे भविष्य आहेत. त्यांच्यामध्ये स्वकर्तृत्वावर प्रचंड विश्‍वास असायला हवा. वैज्ञानिक दृष्टिकोन प्रत्यक्ष अंगिकारलेली पिढी निर्माण व्हायला हवी. यासाठीच महाराष्ट्र शासनाने २०१३ साली "जादूटोणाविरोधी कायदा" प्रत्यक्षात आणला. कायदा झाला परंतु जनजागृतीचे काय? या प्रश्‍नाचे उत्तर प्रत्यक्ष अंमलात यावे म्हणूनच संशोधकाने जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृतीवर आधारीत प्रशिक्षण कार्यक्रम विकसित केला आहे. परंतु सदर प्रशिक्षण कार्यक्रम परिणामकारक झाला आहे किंवा नाही हे तपासून पाहणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच संशोधकाने सदर विषय संशोधनासाठी निवडला आहे.

२. संशोधनाचे शीर्षक :

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अब्यास.

३. समस्या विधान :

सातारा जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रथम वर्षात अध्ययन करणाया विद्यार्थ्यांसाठी संशोधकाने विकसित केलेला "जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रम" प्रभावीपणे राबविल्यास त्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांच्या जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृतीच्या पातळीवर होणाया परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

४. कार्यात्मक व्याख्या :

अ) वरिष्ठ महाविद्यालयातील प्रथम वर्षातील विद्यार्थी. : .महाराष्ट्र राज्यातील शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कार्यक्षेत्रातील सातारा जिल्ह्यातील वाई, खंडाळा आणि महाबळेश्‍वर अशा तीन तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयाचे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील प्रथम वर्षामध्ये (FY) शिक्षण घेणारे विद्यार्थी.

ब) जादूटोणाविरोधी कायदा : "महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबतचा अधिनियम २०१३" याचे संक्षिप्त नाव म्हणजेच जादूटोणाविरोधी कायदा होय.

क) जाणीवजागृती : जादूटोणाविरोधी कायद्यातील १२ अनुसूचींचे स्पष्टीकरण करण्यासाठी दिलेले व्याख्यान, प्रयोग चमत्कारांचे सादरीकरण, पोस्टर्स प्रदर्शन, डॉक्युमेंटरी फिल्म, पुरावे म्हणून दैनिकांमधून प्रसिध्द झालेल्या बातम्यांची कात्रणे, आणि शंका निरसनासाठी प्रश्‍न उत्तरे ...इ. या सर्वांचा योग्य व प्रभावीपणे वापर करून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविणे म्हणजेच जाणीवजागृती करणे होय.

ड) प्रशिक्षण कार्यक्रमाचे विकसन : जादूटोणाविरोधी कायद्यातील १२ अनुसूचींचे स्पष्टीकरण करण्यासाठी संशोधकाने स्वत: तयार केलेले मुद्देसुद व्याख्यान, प्रयोग चमत्कारांचे सादरीकरण, पोस्टर्स प्रदर्शन, डॉक्युमेंटरी फिल्म, संकलित केलेली दैनिकांमधील बातम्यांची कात्रणे, आणि शंका निरसनासाठी दिलेली विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमाचे विकसन होय.

५. संशोधनाची उद्दिष्टे :

१) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे जादूटोणाविरोधी कायदाविषयक असलेले पूर्वज्ञान जाणून घेणे.

२) पूर्वज्ञानाच्या आधारे जाणीवजागृती करिता प्रशिक्षण कार्यक्रमाचे विकसन करणे.

३) संशोधकाने विकसित केलेल्या जादूटोणाविरोधी कायदाविषयक प्रशिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता तपासणे.

६. संशोधनाची गृहितके :

१) विद्यार्थ्यांमध्ये जादूटोणाविरोधी कायदाविषयक अज्ञान व गैरसमज आहेत.

२) विद्यार्थ्यांमध्ये जादूटोणाविरोधी कायदाविषयक असलेले अज्ञान व गैरसमज प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे दूर करता येतील.

७) संशोधनाची परिकल्पना :

संशोधकाने विकसित केलेल्या 'जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रम' प्रभावीपणे राबविल्यास विद्यार्थ्यांच्या जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृतीच्या पातळीवर सार्थ/लक्षणीय वाढ होईल.

८) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे जादूटोणाविरोधी कायदा म्हणजेच त्यामधील १२ अनुसूची संदर्भात आहे. तसेच विद्यार्थ्यांनी पूर्व व उत्तर चाचणीच्या प्रश्नावलीला दिलेल्या प्रतिसादावर संशोधकाचे निष्कर्ष अवलंबून आहेत.

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्र राज्यातील शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कार्यक्षेत्रातील सातारा जिल्ह्यातील वाई, खंडाळा, महाबळेश्वर या तीन तालुक्यातील प्रत्येकी एक प्रमाणे वरिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील प्रथम वर्षात (FY) शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

९) संशोधनाची कार्यपध्दती :

- विद्यार्थ्यांचे जादूटोणाविरोधी कायदाविषयक असलेले पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी पूर्वचाचणीची प्रश्नावली तयार केली. ती तयार करीत असताना विद्यार्थ्यांना न कळणारे प्रश्न, संदिग्धता, अडचणी व तज्ज्ञ मार्गदर्शकांनी सुचविलेल्या सूचनांचा विचार करून पथदर्शी अभ्यासाद्वारे प्रश्नावली तयार केली.
- शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कार्यक्षेत्रातील सातारा जिल्ह्यातील ३ तालुक्यांमधील कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही शाखा असलेली व एका तालुक्यातील एका महाविद्यालयाची निवड सहेतुक सहज प्राप्त याप्रमाणे केली.
- निवड केलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी सुसंवाद साधला. संशोधनाबाबतची कल्पना देवून परवानगी घेतली. तसे पत्र दिले.
- निवड केलेल्या महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या प्राध्यापकांशी सुसंवाद साधला. दिवस आणि वेळ ठरवली. त्यात्या शाखेतील ३० विद्यार्थ्यांची निवड संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील लॉटरी पध्दतीचा वापर करून करण्यात आली.



Vol: 8th , Issue : I , English-Marathi, Quarterly: 1st June 2019,ISSN : 2319-5525


UGC Approval No. 63299

- नमुना निवड केलेल्या विद्यार्थ्यांना पूर्वचाचणी प्रश्नावली दिली व आवश्यक सूचना देवून वेळेत सोडवून परत घेतली. तपासून गुणयादी तयार केली.
- जादूटोणाविरोधी कायद्याचे पूर्वज्ञान प्रश्नावली तपासल्यानंतर कोणते मुद्दे माहित नाहीत आणि नेमका कशावर भर दिला पाहिजे याचा सखोल विचार केला. तज्ज्ञांच्या सूचनांचा आदर करून संशोधकाने या कायद्यातील १२ अनुसूचींवर आधारित १२ चित्रे (पोस्टर्स), डॉक्युमेंटरी फिल्म, प्रयोगचमत्कारांचे सादरीकरणासाठीची तयारी, प्रश्नउत्तरांची तयारी स्वत: केली. प्रशिक्षण कार्यक्रम तयार केला. पथदर्शी अभ्यास करून कायम करण्यात आला.
- ज्या विद्यार्थ्यांची पूर्वचाचणी घेतली त्या विद्यार्थ्यांवर संशोधकाने तयार केलेला प्रशिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबविला.
- त्यानंतर त्याच विद्यार्थ्यांची उत्तरचाचणी प्रश्नावली आवश्यक सूचना देवून सोडवून घेतली. (पूर्व व उत्तर चाचणी प्रश्नावली एकच आहे) ती तपासून गुणयादी तयार केली.
- शाखानिहाय विद्यार्थ्यांची पूर्वचाचणीतील गुण आणि उत्तरचाचणीतील गुण पडताळणी केली. दोन्हीतील फरक अभ्यासला.
- संख्याशास्त्रीय साधन म्हणून मध्यमान, प्रमाणविचलन, 'टी' परिक्षिकेचा वापर करून प्रशिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता तपासली.

१० . संशोधन अभिकल्प :

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक एकलगट पूर्वोत्तर चाचणी अभिकल्प या प्रकाराचा वापर केलेला आहे.

प्रायोगिक एकलगट पूर्वोत्तर चाचणी अभिकल्प



११) संशोधनाची चले :

अ) स्वाश्रयी चल : संशोधकाने विकसित केलेला 'जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रमाचे विकसन.'

ब) आश्रयी चल : विद्यार्थ्यांच्या जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृतीच्या पातळीवर होणारा बदल.

क) नियंत्रित चल : विद्यार्थी : शाखा, इयत्ता, वय.

प्रशिक्षण कार्यक्रम : स्थळ, वेळ, कालावधी.

१२) जनसंख्या :

प्रस्तुत संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कार्यक्षेत्रातील सातारा जिल्ह्यातील वाई, खंडाळा, महाबळेश्वर तालुक्यातील प्रत्येकी एका महाविद्यालयातील कला/वाणिज्य/विज्ञान शाखेतील प्रथम वर्षात (FY) शिक्षण घेत असलेले एकूण २५00 ही विद्यार्थी जनसंख्या म्हणून निवड केली आहे.

१३) नमुना :

प्रस्तुत संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कार्यक्षेत्रातील सातारा जिल्ह्यातील वाई, खंडाळा आणि महाबळेश्वर तालुक्यांतील प्रत्येकी एका महाविद्यालयातील कला/वाणिज्य/विज्ञान या तीनही शाखेतील प्रथम वर्षात (FY) शिक्षण घेत असलेले एकूण १0५ + ९३ + ९0 = २८८ विद्यार्थ्यांची निवड संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील लॉटरी पध्दतीने केली आहे.

१४) संशोधन पध्दत :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने माहिती गोळा करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा तर प्रशिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रायोगिक पध्दतीचा उपयोग केला आहे.

१५) माहिती संकलनाचे साधन :

प्रस्तुत संशोधनामध्ये पूर्व व उत्तर चाचणीच्या गुणांच्या माहितीचे संकलन सर्वेक्षण पध्दतीतील संशोधक निर्मित प्रश्नावलीच्या आधारे करण्यात आले आहे.

!१६) माहिती विश्लेषणाची साधने :

! प्रस्तुत संशोधनामध्ये एकलगट अभिकल्पाची रचना केली आहे. एकलगट अभिकल्पात एकाच गटाचे वेगवेगळ्या वेळी मापन केले जाते. या मापनासाठी मध्यमान, मध्यांक व बहुलक ही केंद्रिय परिमाणे तर प्रमाण विचलन हे विचलनशीलतेचे परिमाण योजले आहे. प्रमाण त्रुटी, नमुना प्रसरण, शिखर दोष, विषमितता, किमान गुणांक, कमाल गुणांक, विस्तार, इत्यादी वर्णनात्मक सांख्यिकीचा माहिती विश्लेषणाची साधने म्हणून वापर केला आहे. तर एकल गटाच्या पूर्व परीक्षण आणि उत्तर परिक्षण यांच्या मध्यमानातील फरकाची सार्थकता तपासण्याकरीता परस्परसंबधीत 'टी' परिक्षिकेचा वापर केला आहे.

तक्ता क्रमांक १

| अ.क्र. | महाविद्यालय | कला | | | वाणिज्य | | | शास्त्र/विज्ञान | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | |
| १ | किसन वीर महाविद्यालय, वाई | ९ | २६ | ३५ | ६ | २९ | ३५ | २१ | १४ | ३५ | १०५ |
| २ | राजेंद्र महाविद्यालय, खंडाळा | १५ | १६ | ३१ | ११ | २० | ३१ | १५ | १६ | ३१ | ९३ |
| ३ | गिरीस्थान महाविद्यालय, महाबळेश्वर | ५ | २५ | ३० | ११ | १९ | ३० | १० | २० | ३० | ९० |
| एकूण | | २९ | ६७ | ९६ | २८ | ६८ | ९६ | ४६ | ५० | ९६ | २८८ |

- फलिते :

तक्ता क्रमांक २
(वर्णनात्मक सांख्यिकी)
एकलगट अभिकल्पातील जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रम प्रश्नावलीच्या पूर्व परीक्षण आणि उत्तर परीक्षण यांतील गुणांकांचे मध्यमान, मध्यांक व बहुलक, विचलन, प्रमाण त्रुटी, नमुना प्रसरण, शिखर दोष, विषमितता, किमान गुणांक, कमाल गुणांक, विस्तार, इत्यादी वर्णनात्मक सांख्यिकी दर्शविणारा तक्ता

| | पूर्व परीक्षण | उत्तर परीक्षण |
|---|---|---|
| मध्यमान | १९.५६६ | ४८.८९२ |
| प्रमाण त्रुटी | ०.२८३ | ०.०९५ |
| मध्यांक | २० | ४९ |
| बहुलक | २५ | ५० |
| प्रमाण विचलन | ४.८०२ | १.६१४ |
| नमुना प्रसरण | २३.०५५ | २.६०५ |
| शिखर दोष | ०.५१५ | २०.८५७ |
| विषमितता | ०.५१२ | ३.४१९ |
| विस्तार | २३ | १५ |
| किमान | ७ | ३५ |
| कमाल | ३० | ५० |
| एकूण गुणांक | ५६३५ | १४०८१ |
| नमुना संख्या | २८८ | २८८ |



Vol: 8th , Issue : I , English-Marathi, Quarterly: 1st June 2019,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

■ सांख्यिकीय विश्लेषण :

■ तक्ता क्रमांक २ मध्ये, एकलगट अभिकल्पातील जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रम प्रश्नावलीच्या पूर्व परीक्षण आणि उत्तर परीक्षण यांतील गुणांकांचे मध्यमान, मध्यांक व बहुलक, विचलन, प्रमाण त्रुटी, नमुना प्रसरण, शिखर दोष, विषमितता किमान गुणांक, कमाल गुणांक, विस्तार, एकूण गुणांक व नमुना संख्या ही वर्णनात्मक सांख्यिकी दर्शवली आहे. यावरून पूर्व परीक्षण गटातील मध्यमान, मध्यांक व बहुलके अनुक्रमे १९.५६६, २० व २५ असल्याचे दिसते. या गटात शिखर दोष व विषमितता आलेली दिसून येईल. याप्रकारेच उत्तर परीक्षण गटातील मध्यमान, मध्यांक व बहुलक अनुक्रमे ४८.८९२, ४९ व ५० असल्याचे दिसते या गटातदेखील शिखर दोष व विषमितता आहे.

पूर्व परीक्षण गटात किमान गुणांक ७ व कमाल गुणांक ३० तर उत्तर परीक्षण गटात किमान गुणांक ३५ व कमाल गुणांक ५० आहे. एकूण गुणांक, मध्यमान, किमान व कमाल गुणांकातील दोन्ही गटातील फरक दिसून येतो. यावरून प्रथमदर्शनी उत्तर परीक्षण गटातील विद्यार्थ्यांच्या जादूटोणाविरोधी कायद्याविषयक जाणीवजागृती वाढ झाल्याचे दिसून येईल.

तक्ता क्रमांक ३

(सहसंबंध)

एकलगट अभिकल्पातील जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रम प्रश्नावलीच्या पूर्व परीक्षण आणि उत्तर परीक्षण या दोन परिवर्तकांतील/चलांतील गुणांकांचे पिअर्सन यांची गुणाकार परिबल सहसंबंध पध्दती वापरून आलेले सहसंबंध मूल्य दर्शविणारा तक्ता

| परिवर्तके | सहसंबंध मूल्य | स्वाधीनता मात्रा | सार्थकता मूल्य | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|
| पूर्व परीक्षण | ०.०६० * | (२८८+२८८) २ = ५७४ | ०.०५ = ०.०८८ | *०.०१ आणि *०.०५ कोणत्याही पातळीला सार्थक सहसंबंध नाही |
| उत्तर परीक्षण | | | ०.०१ = ०.११५ | |

■ सांख्यिकीय विश्लेषण :


■ तक्ता क्रमांक ३ मध्ये, पूर्व परीक्षण आणि उत्तर परीक्षण या दोन परिवर्तकांतील/चलांतील गुणांकांचे पिअर्सन यांची गुणाकार परिबल सहसंबंध पध्दती वापरून आलेले सहसंबंध मूल्य दर्शवले आहे. सदर सहसंबंध मूल्य ०.०६० इतके असून ते निम्न पातळीवरील मूल्य आहे. तसेच ते मूल्य ०.०१ आणि ०.०५ या दोन्हीही पातळीला सार्थ नाही, असे आढळते.

तक्ता क्रमांक ४

('टी' परीक्षिका)

एकलगट अभिकल्पातील जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रम प्रश्नावलीच्या पूर्व परीक्षण आणि उत्तर परीक्षण यांतील गुणांकांचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि परस्परसंबंधित 'टी' परीक्षिकेचे मूल्य दर्शविणारा तक्ता

| गट | नमुना संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | 'टी' मूल्य | एक पुच्छ चाचणीकरीता सार्थकता मूल्य | एक पुच्छ चाचणीकरीता सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व परीक्षण | २८८ | १९.५६६ | ४.८०२ | २८८ १ =२८७ | ९६.५०३* | ०.०५ = १.६५० <br> ०.०१ = २.३३९ | *०.०१ पातळीला सार्थक भेद आहे |
| उत्तर परीक्षण | २८८ | ४८.८९२ | १.६१४ | | | | |



- सांख्यिकीय विश्लेषण :
- तक्ता क्रमांक ४ मध्ये, एकलगट अभिकल्पातील पूर्व परीक्षण आणि उत्तर परीक्षण यांतील गुणांकांचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि परस्परसंबंधित 'टी' परीक्षिकेचे मूल्य दर्शविले आहे. यावरून पूर्व परीक्षण आणि उत्तर परीक्षण यांच्या एक पुच्छ चाचणीसाठी परस्परसंबंधित 'टी' परीक्षिकेचे मूल्य ९६.५0३ आलेले आहे. 'टी' मूल्याची सार्थकता तपासण्याकरिता स्वाधीनता मात्रा २८७ निश्चित केली. स्वाधीनता मात्रा २८७ करिता क्रांतिक मूल्य 0.0५ स्तरावर १.६५0 व 0.0१ स्तरावर २.३३९ इतके आहे. प्राप्त 'टी' मूल्य हे कोष्टक मुल्यापेक्षा मोठे असल्याने एकलगट अभिकल्पातील जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रम प्रश्नावलीच्या पूर्व परीक्षण आणि उत्तर परीक्षण यांच्यातील फरक सार्थ आहे असे म्हणावे लागेल. तसेच आलेला भेद 0.९९ या विश्वास स्तरावर सिध्द होतो.

निष्कर्ष : १) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे जादूटोणाविरोधी कायदाविषयक असलेले पूर्वज्ञान प्रश्नावलीच्या आधारे सर्वेक्षण केले असता असे आढळून आले की, विद्यार्थ्यांमध्ये सदर कायदाविषयक जाणीवजागृती नाही तसेच अज्ञानामुळे गैरसमजांचे प्रमाणही लक्षणीय आहे.

२) संशोधकाने विकसित केलेला 'जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृती प्रशिक्षण कार्यक्रम' प्रभावीपणे राबवल्यास विद्यार्थ्यांच्या जादूटोणाविरोधी कायदाविषयक जाणीवजागृतीच्या पातळीत लक्षणीय वाढ होईल' ही परिकल्पना प्रस्तुत नमुन्याकरीता सिध्द झाली आहे.

२३. **Bibliography -** (संदर्भ सूची)


भिंताडे, वि. (२0१0). शैक्षणिक संशोधन पध्दती. पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

दाभोळकर, न. (१९८५). भ्रम आणि निरास. पुणे : राजहंस प्रकाशन.

दाभोळकर, न. (२0१३). ऐसे कैसे झाले भोंदू. मुंबई : मनोविकास प्रकाशन.

दाभोळकर, न. (२0१४). श्रध्दा अंधश्रध्दा. पुणे : राजहंस प्रकाशन.

दाभोळकर, न. बावगे, मा.(२0१४). मती भानामती. पुणे : राजहंस प्रकाशन.

दाभोळकर, न. आर्डे , प.(२0१४). अंधश्रध्दा; प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम. पुणे : राजहंस प्रकाशन.

घोरमोडे, के. (२00८) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे. नागपूर : विद्याप्रकाशन.

कदम, चा. (१९८९) शैक्षणिक संख्याशास्त्र. पुणे : नूतन प्रकाशन.

मानव, शा. (२00८) रहस्यभेद भानामतीचा भाग १, २, ३. पुणे : मानव पब्लिकेशन.

मानव, शा. (२00८) बुवाबाजी एक फसवेगिरी. पुणे : मानव पब्लिकेशन.

मानव, शा. (२00८) चकवा आणि भूत. पुणे : मानव पब्लिकेशन.

मानव, शा. (२0११) संत चमत्कार आणि बुवाबाजी. पुणे : मानव पब्लिकेशन.

मानव, शा. (२0१३) 'जादूटोणाविरोधी कायदा : समज गैरसमज.' मुंबई : अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मूलन समिती.

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार. (२0 डिसेंबर २0१३) 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २0१३,' मुंबई : प्राधिकृत प्रकाशन.

पाटील, अ. (एप्रिल २0१४). जादूटोणाविरोधी कायद्याची चित्रमय पुस्तिका, ठाणे : महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती.


■■■